आरबीआय/२०१०-११/१८८

डीपीएसएस(सीओ) ईपीपीडी.क्र.४७७/०४.०३.०१/२०१०-११

सप्टेंबर १, २०१०

एनईएफटी/एनईसीएस/ईसीएसमध्ये भाग घेणाऱ्या सभासद बँकांचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक/मुख्य कार्यकारी अधिकारी.

महोदया/महोदय

**क्रेडिट करणे/एनईएफटी/एनईसीएस/ईसीएस व्यवहार परत केले जाणे ह्यामधील विलंबासाठी देय असलेल्या दंडात्मक व्याजामध्ये एकसमानता**

आपणास माहितच आहे, अलिकडील भूतकाळात, रिटेल इलेक्ट्रॉनिक प्रदान उत्पादांमध्ये, त्यांची व्याप्ति व आकारमान अशा दोन्हीहींमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. देशातील जवळ जवळ ७०,००० बँक शाखा एनईएफटी देऊ करत असून ८९ केंद्रांमध्ये ईसीएस उपलब्ध आहे. केवळ जुलै २०१० ह्या एकाच महिन्यात एनईएफटीमध्ये ९ दशलक्षांपेक्षा अधिक व एनईसीएस/ईसीएसमध्ये २५ दशलक्षांपेक्षा अधिक व्यवहारांवर प्रक्रिया करण्यात आली. प्रदान व्यवहारांचे इलेक्ट्रॉनिक माध्यमात स्थलांतरण होण्याबाबत हा शुभशकुन असला तरी, सभासद बँकांद्वारे ग्राहक कार्यक्षमता व ग्राहकसेवा ह्याबाबतचे निकषही परिणामकारक रितीने हाताळले जाणे अत्यंत आवश्यक आहे.

एनईएफटी/एनईसीएस/ईसीएस ह्यांची कार्यकारी मार्गदर्शक तत्वे व तसेच आम्ही वेळोवेळी दिलेली संबंधित परिपत्रके/सूचना ह्यानुसार, सभासद बँकांद्वारे, लाभार्थी खात्यांना किंवा रिटर्न ट्रॅन्झॅक्शन्सना क्रेडिट देणे (कोणत्याही कारणाने क्रेडिट काढून घेतले असल्यास) हे सुरुवात करणाऱ्या/प्रायोजक अशा बँकांना, विहित केलेल्या कालमर्यादेत केले जाणे आवश्यक आहे.

अशा ह्या रिटेल इलेक्ट्रॉनिक प्रदान प्रणालींमध्ये दंडात्मक तरतुदी मात्र एकसमान नाहीत. एनईसीएसच्या बाबतीत, (कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचा परिच्छेद १५.४ ) आणि ईसीएससाठी (कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचा परिच्छेद २०), बँकांना, प्रचालित बँकदर + दोन टक्के ह्या दराने दंडात्मक व्याज द्यावे लागते तर संबंधित तरतुद, एनईएफटीमधील बँक दर ही आहे (कार्यकारी मार्गदर्शक तत्वांचा परिच्छेद ६.७) वापरलेल्या बेंचमार्क दराचे प्रमाणीकरण करण्यासाठी आणि रिटेल प्रदान उत्पादांमधील दंडात्मक तरतुदींमध्ये एकसमानता आणण्यासाठी पुढील बदल करण्यात आले आहेतः-

**एनईसीएस/ईसीएस क्रेडिट**

“......... कोणत्याही विलंबाने क्रेडिटबाबत, ह्या क्रेडिटची देय (ड्यु) असलेल्या तारखेपासून, ते क्रेडिट लाभार्थीच्या खात्यात प्रत्यक्ष जमा केल्याच्या तारखेपर्यंत, डेस्टिनेशन बँकेने, विद्यमान आरबीआय एलएएफ रेपो रेट अधिक दोन टक्के एवढे दंडात्मक व्याज देणे आवश्यक आहे. कोणताही दावा केला नसला तरीही लाभार्थीच्या खात्यात दंडात्मक व्याज क्रेडीट केले जाईल”

परिच्छेद ६.७ - “डेस्टिनेशन बँकेकडे, प्रदानसूचना आल्यानंतरही, लाभार्थीला विलंबाने प्रदान केले जाण्यात, निधी हस्तांतरण पूर्ण न होण्यात, डेस्टिनेशन बँकेच्या कर्मचाऱ्याकडून चूक, निष्काळजीपणा किंवा फसवणूक ह्यामुळे विलंब किंवा चुकीमुळे हानि झाल्यास, डेस्टिनेशन बँक, त्या विलंब काळासाठी विद्यमान आरबीआय एलएएफ रेपो रेट अधिक दोन टक्के एवढी भरपाई देईल. कोणत्याही कारणाने निधी हस्तांतरण सूचना परत करण्यात विलंब झाल्यास, डेस्टिनेशन बँक, परत करण्याच्या तारखेपर्यंत, ती रक्कम, विद्यमान आरबीआय एलएएफ रेपो रेट अधिक दोन टक्के एवढ्या व्याजासह परत करेल.”

परिच्छेद ६.७ देखील पुढीलप्रमाणे आला आहे -

“एनईएफटीच्या कार्यकारी कालात, ओरिजिनेटिंग बँकांनी, एनईएफटी व्यवहारांच्या, ऑन लाईन किंवा काउंटर्सवर त्यांना मिळालेल्या विनंत्या, शक्यतो उपलब्ध असलेल्या पुढील बॅचमध्ये, व अशा विनंत्या आल्याच्या वेळेपासून दोन तासांच्या आत टाकण्यास प्रयत्नशील असावे. असे करण्यात विलंब/विलंबाची शक्यता दिसून आल्यास, ओरिजिनेटर्स/ग्राहक ह्यांना त्या विलंबा/विलंबाच्या शक्यतेबाबत सकारण कळवावे.”

कार्यकारी मार्गदर्शक तत्वांमधील ह्या बदलांची सभासद बँकांनी नोंद घ्यावी. हे बदल ताबडतोब जारी करण्यात आले आहेत.

आपला<br>
**(जी. पद्मनाभन्)**<br>
मुख्य महाव्यवस्थापक